# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी राष्ट्रीय पेयजल योजना राबविण्याबाबत

**(१) ५८३३ (०७-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.शंभूराज देसाई (पाटण), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षासाठी केंद्र सरकारने १०० कोटी १५ लाख आणि राज्य सरकार कडून २८ कोटी असा एकूण १२८ कोटी ३५ लाख रुपयांचा निधी माहे जानेवारी २०१५ मध्ये वितरित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अल्पसंख्यांकासह दलित, भटक्या विमुक्त्यांच्या अनेक वस्त्यांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अद्याप पोहचला नसुन राज्यातील १,००,४८८ वस्त्यांपैकी हजारो वस्त्या अद्याप पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-२०१५ मध्ये उदिष्ट असलेल्या २,२५४ दलित वस्त्यांपैकी अवघ्या १७ ठिकाणीच या योजनेचे काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच केंद्राने १७ प्रयोगशाळा बांधण्याचे उद्दिष्ट देऊन अद्याप एकही प्रयोगशाळा उभी राहिलेली नाही तर गाव पाणीपुरवठा समिती सदस्यांच्या प्रशिक्षणातही राज्य पिछाडीवर असून ३९ हजार ५७० पैकी अवघ्या १८९४ सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, सन २०१५-१६ चा राष्ट्रीय पेयजल आराखडा तयार करताना केवळ टँकरग्रस्त गावे/वाडया व दुषीत पाणी पुरवठा होणारी गावे/वाड्या व सन २०१४-१५ मध्ये ज्यांचे अंदाजपत्रक तयार आहे यांचाच समावेश करण्याच्या सूचना पाणीपुरवठा विभागाचे सचिव यांनी दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी घेतलेल्या बैठकीत केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सन २०१४-२०१५ मध्ये राज्यात शासनाने किती योजनांना मंजूरी देवून त्या पुर्ण करण्यात आल्या व त्यातील किती योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतर करण्यात आल्या व राज्यातील भटक्या व दलित वस्त्यांमध्ये सदर राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) : (**१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने जानेवारी २०१५ मध्ये केंद्र व राज्य हिश्यापोटी एकूण रू.१२८.३५ कोटी एवढा निधी संबंधीत अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत केला आहे, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये दि.०१/०४/२०१५ नुसार असलेल्या एकूण १,००,६३९ वाडया/वस्त्यांपैकी ८९,४०४ वाड्या/वस्त्यांना शासन निकषानुसार पाणी पुरवठा उपलब्ध करण्यात आला आहे. उर्वरित ११,२३५ वाड्या/वस्त्यांना अंशत: पाणी पुरवठा उपलब्ध करण्यात आला आहे:
(३) राज्यातील एकूण २,२५४ दलित वस्त्यांपैकी १९५२ वस्त्यांना शासन निकषानुसार पाणी पुरवठा उपलब्ध आहे. सन २०१४-१५ च्या कृती आराखडयात निश्चित करण्यात आलेल्या ९८ वाड्या/वस्त्यांच्या उद्दिष्टांपैकी मार्च २०१५ अखेर ८४ वाडयांना पाणी पुरवठा उपलब्ध करुन दिलेला आहे.
(४) केंद्र शासनाने दिलेल्या १८ प्रयोगशाळा बांधण्याच्या उद्दिष्टापैकी १७ प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी आवश्यक निधी संबंधित यंत्रणांना वितरित करण्यात आला असून प्रयोगशाळा स्थापनेबाबतचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच गाव पाणी पुरवठा समितीच्या ३९,५७० सदस्यांना द्यावयाच्या प्रशिक्षणापैकी १५,६५२ सदस्यांना माहे जानेवारी २०१५ अखेर पर्यंत प्रशिक्षण देण्यात आले आहे.
(५) केंद्र शासनाने सन २०१५-१६ या वर्षाचा कृती आराखडा तयार करण्यासंदर्भात दि.०९/०१/२०१५ च्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक त्या सूचना प्रधान सचिव पापुस्ववि यांनी दि. २०/०१/२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या आहेत.
(६) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ या वर्षासाठी घेण्यात आलेल्या ४२०० गावे / वाड्या वस्त्यांच्या उद्दिष्टांपैकी मार्च २०१५ अखेर ३,७४७ गावे / वाड्या वस्त्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. या अंतर्गत सन २०१४-१५ या वर्षात अनुसूचित जाती अंतर्गत घेण्यात आलेल्या ९८ गावे/वाड्या वस्त्यांच्या उद्दिष्टांपैकी मार्च २०१५ अखेर ८४ गावे / वाड्या वस्त्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे.तसेच सन २०१४-१५ या वर्षात अनुसूचित जमाती अंतर्गत घेण्यात आलेल्या ६७६ गावे / वाड्या वस्त्यांच्या उद्दिष्टांपैकी मार्च २०१५ अखेर ६४२ गावे/वाड्या वस्त्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

## कोल्हापूर येथील जयप्रभा स्टुडिओ शासनाने विकत घेण्याची मागणी

**(२) ४३०२९ (२८-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील जयप्रभा स्टुडिओचा संरक्षित वारसा वास्तुमध्ये समावेश झाला असून सदर वारसा जपण्याकरिता सदर स्टुडिओ शासनाने विकत घेण्याची मागणी कोल्हापूरकरांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१६) :** (१) कोल्हापूर येथील जयप्रभा स्टुडिओ शासनाने विकत घेण्याबाबत जानेवारी, २०१६ मध्ये निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) हा विषय शासनाच्या अखत्यारितील नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली येथील अन्न व औषध प्रशासन विभागाने जप्त केलेले साहित्य जुन्या मार्केट यार्ड कार्यालयात पडून असल्याबाबत

**(३) ४६८६० (०३-०५-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील अन्न व औषध प्रशासन विभागाने जप्त केलेले कोटयवधी रुपयांचे मेफेड्रॉन व केटमाईन व महत्वाची कागदपत्रे, व्हिजिट बुक जुन्या मार्केट यार्ड कार्यालयात पडून असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत अन्न व औषध प्रशासन विभागाचे कार्यालय विजयनगर येथील मध्यवर्ती कार्यालयात हलविण्यात आले आहे परंतु उपरोक्त सर्व साहित्य पूर्वीच्या जुन्या मार्केट यार्ड कार्यालयातच ठेवण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जुन्या मार्केट यार्ड कार्यालयाकरिता कोणत्याही प्रकारची सुरक्षा व्यवस्था किंवा बंदोबस्त ठेवण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगांने या सर्व साहित्याचा दुरुपयोग होऊ नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) : (**१) जुने मार्केट येथील कार्यालय अन्न व औषध प्रशासन सांगली यांचे ताब्यात असून ते भाडेतत्वावर घेण्यात आलेले आहे. मेफेड्रॉन व केटमाईन यांचा जप्त केलेला साठा तसेच काही कागदपत्रे येथे ठेवण्यात आली होती. दि. २०/०१/२०१६ च्या दैनिक पुढारी मध्ये याबाबतची बातमी छापून आली होती.

(२)तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार फक्त जप्त मुद्देमाल हा जुने मार्केट येथील कार्यालयात ठेवण्यात आलेला आहे. उर्वरीत कागदपत्रे विजयनगर येथील कार्यालयात हलविण्यात आली आहेत.

(३) जुने मार्केट कार्यालय हे कुलूपबंद आहे. सदर कार्यालय उघडणे किंवा बंद करणे याबाबत नोंदवही ठेवण्यात आली आहे. तसेच सुरक्षिततेसाठी तिथे दोन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पाणी व स्वच्छतेसाठी असलेल्या योजनांना केंद्र शासनाने निधी बंद केल्याबाबत**

**(४) ४८००३ (२८-०४-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाणी व स्वच्छतेसाठी असलेल्या योजनांना केंद्र शासनाने निधी बंद केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने पाणी पुरवठा योजनेसाठी स्वत: निधी उपलब्ध करुन ४ वर्षाचा कार्यक्रम आखला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यात किती पाणी पुरवठा व भुयारी गटारांच्या योजनांसाठी निधी तसेच राज्य शासनाच्या पाणी पुरवठा योजनेसाठी निधी उपलब्ध होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-१०-२०१६) : (**१) काही अपवाद वगळता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नविन पाणी पुरवठा योजना घेऊ नयेत अशा केंद्र शासनाने सूचना दिल्या आहेत. या व्यतिरिक्त राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व स्वच्छ भारत अभियान या दोन्ही योजनांसाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होत आहे.

(२) व (३) राज्य शासनाने मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम ही नवीन योजना सुरु केली असून याबाबतचा सर्वसमावेशक शासन निर्णय दि.०७/०५/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रम सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या चार वर्षात राबविण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा ग्रामीण पाणी पुरवठा योजना असल्याने यामध्ये भुयारी गटारांची योजना समाविष्ट नाही. सदर योजनेंतर्गत जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग कडील १७ स्वतंत्र योजना तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील १ प्रादेशिक योजना अशा एकूण १८ योजना सिंधुदुर्ग जिल्ह्यांतर्गत समाविष्ट आहेत.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेसाठी चालू आर्थिक वर्षासाठी रु.५००.०० कोटी एवढी तरतूद (पूर्ण राज्यासाठी) अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गेवराई (जि.बीड) तालुक्यात ग्रामीण भागामधील हातपंप नादुरुस्त असल्याबाबत

**(५) ५२४९९ (१०-०८-२०१६). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई तालुक्यात (जि.बीड) ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याकरीता जिल्हा परिषदेअंतर्गत प्रत्येक गावांमध्ये हातपंप (हाप्सा) बसविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेवराई पंचायत समितीच्या अनागोंदी कारभारामुळे हे हातपंप नादुरुस्त असून किरकोळ दुरुस्तीअभावी हे बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हातपंप दुरुस्त केल्यास या भागात जो टँकरने पाणीपुरवठा केला जातो व त्यावर जो करोडो रुपयांचा खर्च होतो तो होणार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गेवराई तालुक्यातील हातपंप दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) गेवराई तालुक्यातील नियमित देखभाल व दुरुस्तीअंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात नादुरुस्त होणारे हातपंप तात्काळ दुरुस्ती करण्यासाठी गेवराई पंचायत समितीकडे दोन फिरती दुरुस्ती पथके, आवश्यक कर्मचारी व दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य उपलब्ध आहे. नादुरुस्त हातपंप पथकाद्‌वारे ग्रामपंचायतीच्या मागणीप्रमाणे तात्काळ दुरुस्त करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात जीवनावश्यक वस्तू तूरडाळीसह रास्त भावाने विक्री करण्याबाबत**

**(६) ५३८४१ (१०-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाद्यतेल व तुरडाळीचे भाव आटोक्यात आणण्यासाठी ७ प्रादेशिक विभागात तीन महिन्यात ५,५९२ ठिकाणी धाडी घालून डाळ, तेल, तेलबीयाणे इ. ५३९ कोटी ५० लाख १५ हजार ७४५ रुपयांच्या साठेबाजाकडून ताब्यात घेतलेल्या जीवनावश्यक वस्तू बाजारात विक्रीसाठी तात्काळ येणे आवश्यक असल्याच्या कारणास्तव दिनांक २४.११.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये जप्त केलेल्या कडधान्याच्या साठ्याची विल्हेवाट लावण्याबाबत कोणत्या अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या होत्या,

(२) असल्यास, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार डाळीची साठेबाजी करणाऱ्याकडून १०० रुपये स्टँप पेपरवर दंडपत्र लिहून घेऊन पकडण्यात आलेली डाळ १०० रुपये किलो दराने राज्यात विकली जाईल असे दंडपत्रात लिहून घेऊन, पकडलेला डाळीचा साठा परत करण्यात आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील दंडपत्रात कबूल केल्यानुसार रेशन माफियांनी डाळ बाजारात विक्रीस आणलेली नाही तसेच किरकोळ बाजारात तूरडाळ २०० रुपये किलो या दराने विकली जात असून इतर कडधान्यांचे भाव वाढल्याने सर्वसामान्य नागरीकांवर मोठा आर्थिक भार पडत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच राज्यात रेशन कार्डावर देण्यात येणाऱ्या तुरडाळ योजनेसाठी २०० कोटी रुपयांची तरतूद न केल्यामुळे सदर योजना रखडली असल्याचे माहे एप्रिल २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच राज्यातील शेतकऱ्यांकडून ५० ते ६० रुपये किलो इतक्या कमी दराने तूरडाळ खरेदी करुन सदर डाळ १०० ते १५० रुपये किलो दराने व्यापारी विकत असल्यामुळे त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता तसेच जप्त केलेल्या जीवनावश्यक वस्तू तूरडाळीसह रास्त भावाने विक्री करण्याबाबत अथवा सदर माल रेशनदुकानातून अन्न सुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांना वितरीत करण्याबाबत आणि भविष्यात साठेबाजावर नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२६-०९-२०१६) :** (१) राज्य शासनाच्या दि.१९.१०.२०१५ च्या पत्रास अनुसरुन, जप्त करण्यात आलेला तूर / तूरडाळीचा साठा संबंधित व्यापाऱ्याकडून Indemnity Bond घेऊन, त्याला परत करण्याबाबत दिनांक २४.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात आले. सदर शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे अटी व शर्ती विहित करण्यात आल्या होत्या :-

१) मुक्त केलेली तूरडाळ व मुक्त केलेल्या तूरीच्या भरडाईनंतर तयार झालेली तूरडाळ महाराष्ट्र राज्यातच रु.१००/- प्रतिकिलो या दराने ग्राहकास विकली जाईल,

२) मुक्त केलेले कडधान्य महाराष्ट्र राज्यातच विकले जाईल या अटीवर Indemnity Bond घेऊन, मुक्त करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

३) संबंधित व्यापाऱ्यांनी Indemnity Bond भरुन देण्यास नकार दर्शविल्यास जप्त केलेल्या साठ्याचा जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मधील तरतूदीनुसार जाहिर लिलाव करण्यात यावा.

(२) होय. हे खरे आहे.

दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयास अनुसरुन जप्त करण्यात आलेला डाळी /कडधान्याच्या साठा Indemnity Bond घेऊन मुक्त करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयास अनुसरुन मुक्त केलेली तूरडाळ संबंधित साठामालक / व्यापाऱ्यांनी अकोला, जळगांव, नागपूर, रायगड येथे विकल्याची देयके संबंधित प्राधिकाऱ्यांकडे प्राप्त झाली आहेत.

दुष्काळी परिस्थिती व अपुऱ्या उत्पादनामुळे तूरडाळ तसेच इतर कडधान्यांचे वाढलेले दर, शासनाने केलेल्या विविध उपाययोजनांमुळे नियंत्रित ठेवण्यास मदत झाली आहे.

(४) सर्वसामान्य जनतेसाठी लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अंत्योदय अन्न योजना व बीपीएल मधील शिधापत्रिकाधारकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत कमाल रु.१२०/- प्रतिकिलो प्रतिशिधापत्रिका प्रतिमाह १ किलो तूरडाळ उपलब्ध करुन देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २१.०७.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने रु.१०३/- या दराने तूरडाळ वाटपासाठी लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अंत्योदय अन्न योजना व बीपीएल मधील शिधापत्रिकाधारकांना

NCDEX Spot Exchange मार्फत ई-लिलावाद्वारे खुल्या बाजारातून माहे ऑगस्ट, २०१६ ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीसाठी देण्यात येत आहे.

(५) डाळींचे दर नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून सर्व जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर त्यांच्या जिल्ह्यातील सर्व संबंधित किरकोळ व घाऊक व्यापारी तसेच आयातदार यांच्या नियमितपणे बैठका घेऊन, आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत तसेच जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत साठा निर्बंधाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत राज्य शासनाच्या दि.१६.०४.२०१६ व दि.२०.०६.२०१६ च्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

डाळींचे दर नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून डाळींसाठी दर नियंत्रक कायद्याचे प्रारुप तयार करण्यात आले असून, सदरचे प्रारुप केंद्र शासनाकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहे.

शासनाच्या दि.१९.१०.२०१५ च्या पत्रास अनुसरुन जप्त करण्यात आलेली तूरडाळ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रेशनिंगचा काळा बाजार करणाऱ्या संस्थांबाबत

**(७) ५३८५६ (१०-०८-२०१६). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह, नवी मुंबई, ठाणे, कल्याण येथील रेशनिंगचा काळा बाजार करणाऱ्या ३० संस्थांवर सन २००९ ते २०१५ या कालावधीत धान्याच्या अपहार प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रेशन माफियांनी परवाने रद्द होताच मंत्रालयात जाऊन निलंबित परवाने पूर्ववत करून घेतले असल्याचे व यापैकी अनेक संस्थांवर केवळ दंडात्मक कारवाई, नियतन स्थगिती व प्राधिकार पत्र रद्दची तात्पुरती कारवाई करून महिनाभरात निलंबित परवाने पुन्हा सुरु केल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रेशनिंगचा काळा बाजार करणाऱ्या संस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच उक्त गुन्हे दाखल केलेल्या संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२९-०९-२०१६) : (**१) होय.

(२) सन २००९ ते २०१५ या कालावधीमध्ये २४ संघटीत संस्था निलंबनानंतर ४ ते ५ महिन्याच्या कालावधीत शासन आदेशानुसार पुन्हा सुरु करण्यात आल्या आहेत. तसेच ५ संघटित संस्था रद्द करण्यात आल्या आहेत.

मात्र माहे मे,२०१६ मध्ये वा दरम्यान अनेक संस्थावर केवळ दंडात्मक कारवाई, नियतन स्थगिती व प्राधिकारपत्र रद्दची तात्पुरती कारवाई करुन महिन्याभरात निलंबित परवाने पुन्हा सुरु केल्याचे निदेर्शनास आले नाही.

(३) अन्नधान्याच्या ट्रकच्या वाहतुकीदरम्यान होणाऱ्या अन्नधान्याच्या अपवापरास प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने तसेच वाहतुकीदरम्यान ट्रकच्या ठावठिकाणाची प्रत्येक टप्प्यावरील माहिती/मागोवा घेण्यात येतो.

फिरत्या पथकामार्फत संघटित संस्थेविरुध्द गुन्हा नोंद करण्याची कारवाई करण्यात येते व कारवाईअंती संस्था निलंबित वा रद्द करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे शिंगोर्णी (ता. माळशिरस, जि. सोलापूर) येथील पाणी पुरवठा पाईपलाईनचे काम निकृष्ट प्रतीचे झाल्याबाबत**

**(८) ५३८५८ (१०-०८-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिंगोर्णी (ता. माळशिरस, जि. सोलापूर) येथील पाणी पुरवठा पाईप लाईनचे काम निकृष्ट प्रतीचे झाल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्‌नूसार सदर ठेकेदारांवर कोणती कारवाई केली आहे तसेच सदरचे काम दर्जेदार करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-०९-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) ग्रामस्थांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरुन उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी तक्रारदारासमवेत सदर योजनेची पाहणी केली.

(३) पाहणी अंती, सदर योजनेसाठी वापरण्यात आलेले पी.व्ही.सी. पाईप उच्च प्रतीचे व चांगल्या दर्जाचे असल्याचे आढळून आले. तसेच शिंगोर्णी गावठाणातील भाग डोंगराळ असल्याने सुरंग लावून खोदाई करणे शक्य नसल्याने पाईपलाईनची चारी खोदाई काही ठिकाणी मंजूर खोदाईपेक्षा कमी खोलीची दिसून आली. ज्या ठिकाणी कमी खोलीवर पाईप्स टाकले आहेत, त्या ठिकाणचे पाईप्स काढून, पाईप लाईनची चारीची खोली वाढवून पुन्हा पाईपलाईन टाकणेबाबत ग्रामपंचायत, शिंगोर्णी यांना सूचना देण्यात आल्या. त्यानुसार, शिंगोर्णी ग्रामपंचायतीने आवश्यक त्या ठिकाणी खोली वाढवून पाईप टाकले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात भूजल पातळी खालावली असल्याबाबत**

**(९) ५४०९३ (१०-०८-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भूजल साठयातून सिंचनासाठी, औद्योगिक वापरासाठी तसेच शहरीकरण व वाढत्या लोकसंख्येनुसार पिण्याच्या वाढत्या मागणीमुळे भूजल उपसा मोठया प्रमाणात होत असल्याने तसेच भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागाकडून करण्यात आलेल्या भूजल पातळीच्या सर्वेक्षणातून राज्यातील १८ हजार गावांमधील भूजल पातळी खालावली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील सुमारे २८५ तालुक्यांमधील ३१ हजार ९२० गावांमध्ये पाण्याची पातळी एक ते तीन मीटरपेक्षा कमी झाल्याने नजीकच्या काळात पाण्याचा प्रश्न अधिकच भीषण होणार असल्याने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्व साधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-१०-२०१६) :** (१) राज्याची भौगोलिक व भूशास्त्रीय स्थिती लक्षात घेता भूजल पातळी ही मोठ्या प्रमाणावर पर्जन्यमानावर अवलंबुन असते. गतवर्षी सन २०१५ मध्ये पर्जन्यमानातील तुटीचा परिणाम भूजल साठ्यावर झालेला आहे. यास्तव राज्यात मार्च, २०१६ मधील निरिक्षण विहिरीच्या भूजल पातळीची मागील पाच वर्षाच्या मार्चच्या सरासरी भूजल पातळीशी तुलना केली असता १८,५०२ गावात १ मीटरपेक्षा जास्त घट आढळून येते.

(२) महाराष्ट्र भूजल अधिनियम (विकास व व्यवस्थापन) २००९ नुसार राज्य भूजल प्राधिकरण, मुंबई यांनी ८० पाणलोट क्षेत्रामध्ये खोल विहीरी घेण्यास बंदी आणली आहे.

राज्यामध्ये भूजल पातळी वाढविण्याबाबत जलयुक्त शिवार अभियान, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) इ. योजना राबविण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण मतदारसंघातील गांवे व वाडयावस्त्यांना कायम स्वरुपी पिण्याच्या पाण्याच्या योजना कार्यान्वीत करणेकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१०) ५४४०९ (१०-०८-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील पाटण विधानसभा मतदारसंघातील बहुतांशी गांवे व वाडया वस्त्या या डोंगरी भागात वसलेल्या असून उन्हाळ्यामध्ये सदर गावांना व वाडयावस्त्यांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंगरी भागातील या गांवाना व वाडयावस्त्यांना माहे जानेवारी,फेब्रुवारी महिन्यामध्येच पिण्याच्या पाण्याचा टँकर पुरवावा लागतो, यंदाच्या वर्षी २४ गांवाना व वाडयावस्त्यांना ८ टँकरने पाणी पुरवठा करावा लागला होता. तर सुमारे ७५ ठिकाणी विंधन विहीरींची कामे करावी लागली होती तसेच डोंगरी भागातील अनेक गांवामधील आणि वाडी वस्तीमधील अस्तित्वात असणा-या नळ पाणी पुरवठा योजना या कालबाह्य झाल्यामुळे ही पाण्याची तीव्र टंचाई भासत होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणा-या गांवाना कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याच्या योजना कार्यान्वीत करणेकरीता व निधी उपलब्ध करुन देण्याकरीता मा. पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ फेब्रुवारी, २०१५, दिनांक ०१ डिसेंबर, २०१५ व दिनांक ०६ एप्रिल, २०१६ रोजी लेखी पत्रव्यवहार करुन निधीची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) : (**१) हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

सन २०१५ च्या पावसाळ्यात पाटण तालुक्यात सरासरी ४४ टक्के पाऊस पडल्याने मार्च २०१६ पासून टंचाई निवारणार्थ टँकरने पाणी पुरवठा करावा लागला होता. संपूर्ण टंचाई कालावधीत १ गाव व १३ वाड्यांना ५ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) केंद्र शासनाचे दि.२९.६.२०१५ च्या पत्रान्वये काही अपवाद वगळता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नवीन पाणी पुरवठा योजना घेण्यात येऊ नये अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे सद्यःस्थितीत त्या कार्यक्रमांतर्गत नवीन पाणी पुरवठा योजना घेता येत नाहीत. तथापि राज्यात नव्याने सुरु करण्यात आलेल्या व सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षांच्या कालावधीत राबवावयाच्या मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमात पाटण तालुक्यातील ८ पाणी पुरवठा योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शिवणे (ता. गुहागर, जि.रत्नागिरी) गावाला कायमस्वरूपी पाणी पुरवठा करण्याबाबत

**(११) ५४४६८ (१०-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवणे (ता. गुहागर, जि.रत्नागिरी) या गावामध्ये माहे मार्चपासून पाऊस पडेपर्यंत तीव्र पाणीटंचाई निर्माण होत असून ग्रामस्थ-महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागते,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाचा कायमस्वरूपी पाणीप्रश्न सोडविण्यासाठी नळपाणी योजनेच्या अंदाजपत्रक व आराखडा तयार करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-१०-२०१६)** :(१) अंशतः खरे आहे.
शिवणे गावात १० वाड्या असून सर्व वाड्यांना पिण्याच्या पाण्याची योजना आहे. तथापि, सन २०१६ च्या उन्हाळ्यात ३ वाड्यांना स्त्रोत आटल्यामुळे दिनांक १२/०५/२०१६ ते २७/०६/२०१६ म्हणजे शेवटच्या दिड महिन्याच्या कालावधीसाठी टँकरने पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.
(२) सदर संपूर्ण गावासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविण्यात आलेली नळपाणी पुरवठा योजना नादुरुस्त असल्याने सदर योजनेचे नुतनीकरण केल्यास उक्त गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. तद्ननुसार सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून अंदाजपत्रक व आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगावं जिल्हयातील रावेर, यावल, चोपडयांची भूजल स्थिती डार्वी झोनमध्ये जाण्याची शक्यता निर्माण झाल्याबाबत

**(१२) ५४५३१ (१०-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगावं जिल्हयातील रावेर, यावल, चोपडा येथील भूजल स्थिती डार्वी झोनमध्ये जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच चाळीसगांव, पाचोरा, पारोळा, जळगांव आणि अंमळनेर या तालुक्यातील भूजल पातळीत मोठया प्रमाणात घट झाल्याचे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या निरिक्षणातून माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, भूजल पातळीत होणारी लक्षणीय घट सुधारण्याकरिता जलपुनर्भरण मोहिम राबविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,याबाबतची सद्यःस्थिती काय आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-१०-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे. भूजल अंदाज अहवाल (२०११) नुसार रावेर व यावल तालुका अतिशोषित (डार्क झोन) या वर्गवारीत तर चोपडा तालुका अंशतः शोषित (सेमी -क्रिटीकल) या वर्गवारीमध्ये समाविष्ट आहे.

(२) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत माहे मार्च, २०१६ मध्ये जिल्हयात निश्चित केलेल्या निरीक्षण विहीरींची भूजल पातळीची नोंद घेऊन त्याची मागील ५ वर्षांच्या मार्च महिन्यांच्या सरासरी भूजल पातळीशी तुलना केली असता जिल्हयातील चाळीसगाव, पाचोरा, पारोळा, जळगाव, आणि अंमळनेर या तालुक्यात भूजल पातळीत घट झाल्याचे आढळुन येत आहे.

(३) राज्याची भौगोलिक व भूशास्त्रीय स्थिती लक्षात घेता भूजल पातळी ही मोठ्या प्रमाणावर पर्जन्यमानावर अवलंबुन असते. अनियंत्रित भूजल उपसा झाल्यास, पर्जन्यमानाद्वारे दर वर्षी उपलब्ध होणा-या भूजल साठ्यावर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो.

महाराष्ट्र भूजल अधिनियम (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील कलम-८ (१) नुसार राज्य भूजल प्राधिकरण, मुंबई यांनी ८० अतिशोषित व शोषित पाणलोट क्षेत्रामध्ये ६० मी. पेक्षा जास्त खोल विहीरी घेण्यास बंदी आणली आहे.

राज्यामध्ये भूजल पातळी वाढविण्यासाठी जलयूक्त शिवार अभियान, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) ई. कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हयातील रास्त भाव दुकानांची तपासणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिल्याबाबत

**(१३) ५४७८५ (१०-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील सार्वजनिक वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी रास्त भाव दुकानांची तपासणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिनांक ०१ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवली शहरात तसेच शीळ, दिवा विभागात नागरिकांना योग्य प्रकारे शिधावाटप होत नसल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सबंधित शिधावाटप केंद्रांची तपासणी करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२९-०९-२०१६) :** (१) होय,

(२) डोंबिवली शहर, शीळ व दिवा विभाग हे जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यकक्षेत येत नसून ते नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांच्या कार्यकक्षेत येतात. डोंबिवली विभागातील शिधावाटप कार्यालयात शिधापत्रिकाधारकांना शिधाजिन्नस न मिळाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, दिनांक २३.०२.२०१६ रोजी मुंब्रा विभागातील शिधावाटप कार्यालयास मा.विधानसभा सदस्य यांचेकडून अ.शि.दु.क्र.४८ फ १०१ व ४८ फ ६९ बाबत तक्रार प्राप्त झालेली आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने रास्तभाव दुकान क्र.४८ फ १०१ नंदा पाटील व किरकोळ केरोसीन परवाना क्रमांक ४८ फ ६९ शशिकांत पाटील या दुकानांची तपासणी करुन दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ढासाळवाडी (जि.बुलढाणा) येथे जलस्वराज्य योजनेअंतर्गत**
**पाणी पुरवठा योजना अपूर्ण असल्याबाबत**

**(१४) ५५२७० (१०-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढासाळवाडी (जि.बुलढाणा) गावाला नैसर्गिक पाण्याचा एकही स्त्रोत नाही त्यामुळे बाराही महिने सदर गावाला टँकरद्वारे किंवा सैलानी येथून बैलगाडीने पाणी आणावे लागत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावासाठी सन २००८ मध्ये २६ लाख रुपये खर्चून जलस्वराज्य योजना राबविण्यात आली परंतू सदर योजनचे काम संबंधित ठेकेदारांने अपूर्ण ठेवले असल्याने ग्रामस्थांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

मौजे ढासळवाडी (जि.बुलढाणा) गावाला दोन वर्षापासून कमी पर्जन्यमानामुळे विंधन विहीरीचे पाणी कमी झाल्याने दि. १९/३/२०१६ ते ११/७/२०१६ या कालावधीत टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला.
(२) सन २००८-०९ मध्ये मौ.ढासाळवाडी (ता.जि. बुलडाणा) या गावासाठी रु.२६.७४ लक्ष किंमतीच्या योजनेस भारत निर्माण कार्यक्रमा अंतर्गत मंजूरी देण्यात आली.

ग्रामपंचायत व ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीतील अंतर्गत वाद तसेच समिती व कंत्राटदार यांच्यातील वादामुळे कंत्राटदारास योजनेच्या मुल्यांकनाप्रमाणे उर्वरीत देयकाची अदायगी न केल्यामुळे योजनेचे काम अपूर्ण आहे.

तथापि, योजनेच्या विंधन विहीर व पाईपलाईनद्वारे सन २०१२ पासून ग्रामस्थांना पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(३) सदरहू योजनेची उर्वरीत कामे पूर्ण करण्याबाबत समिती तसेच ग्रामपंचायतीकडे जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागाकडून वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला आहे. सरपंच/ सचिव, ग्रामपंचायत ढासाळवाडी यांनी सदर योजनेचे अपूर्ण काम ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणामार्फत करण्याचे कळविल्यानुसार, योजनेचे काम जिल्हा परिषदेमार्फत पुर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### हातणी (ता.चिखली,जि.बुलढाणा) येथील पाणी पुरवठा योजनेचे हस्तांतरण करण्याबाबत

**(१५) ५५२७६ (१०-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातणी (ता.चिखली,जि.बुलढाणा) येथे महाजल योजना असुनही सदर योजनेचे हस्तांतरण न झाल्याने गावकऱ्यांना अद्यापपर्यत योजनेचे पाणी मिळाले नसल्याने पाणी टंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांची गैरसोय झाली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव वरील परिसरात प्रशासनाने महाजल योजनेचे पाणी गावाला उपलब्ध करुन द्यावे अन्यथा टँकरची मंजुरी देऊन गावातील पाणी समस्या सोडवावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामगील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) मौजे हातणी येथील योजनेचे वीज रोहीत्र जळाल्याने तसेच योजनेची थकीत वीजबील भरण्याची कार्यवाही न केल्यामुळे विज पुरवठा होत नसल्यामुळे योजनेतून पाणी पुरवठा होत नव्हता. त्यामुळे उन्हाळयात दिनांक १३/४/२०१६ ते दिनांक १२/७/२०१६ या कालावधीत दोन टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

आता, योजनेचे वीज रोहीत्र दुरुस्त करण्यात आले असून, योजना हस्तांतरीत करण्याकरीता योजनेची चाचणी घेण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अकोला जिल्हयात ३०० ते ३५० फूटापर्यंत बोअरचे खोदकाम करीत असल्याबाबत

**(१६) ५५४३१ (१०-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २०० फूटापर्यंत बोअरवेलचे खोदकाम करावे, त्यापेक्षा जास्त खोलीचे बोअर करु नये असे स्पष्ट निर्देश असताना अकोला व वाशिम जिल्हयामध्ये ३०० ते ३५० फूटापर्यंत बोअरवेलचे खोदकाम केले जात असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पाण्याचा बिकट प्रश्न निर्माण झाल्याने उक्त निर्देशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) :** (१) जिल्हाधिकारी, अकोला व वाशिम यांचे अहवालानुसार पाणी टंचाई व विविध योजनेतंर्गत २०० फुटापेक्षा जास्त खोल बोअरवेल घेण्यात आलेल्या नाहीत.
(२) राज्याची भौगोलिक व भूशास्त्रीय स्थिती लक्षात घेता भूजल पातळी ही मोठ्या प्रमाणावर पर्जन्यमानावर अवलंबुन असते. अनियंत्रित भूजल उपसा झाल्यास, पर्जन्यमानाद्वारे दर वर्षी उपलब्ध होणा-या भूजल साठ्यावर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो.

महाराष्ट्र भूजल अधिनियम (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ नुसार राज्य भूजल प्राधिकरण, मुंबई यांनी ८० पाणलोट क्षेत्रामध्ये खोल विहीरी घेण्यास बंदी आणली आहे. तसेच राज्यामध्ये भूजल पातळी वाढविण्यासाठी जलयूक्त शिवार अभियान, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) ई. योजना राबविण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

### राज्यातील पॅकबंद वस्तूंची छापील किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणाऱ्यांविरूध्द केलेल्या कारवाईबाबत

**(१७) ५५४७० (१२-०८-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील क्लब, हॉस्पीटल, महाविद्यालयांमधील उपहारगृहांमध्ये, जिमखाना यातील कॅन्टीन, विविध सिनेमागृहे, रेल्वे व बस स्थानके, विमानतळे, फूड मॉल, हॉटेलमध्ये छापील किंमतीपेक्षा जास्त दराने पॅकबंद वस्तूंची, पाणी बाटली व शीतपेये यांची विक्री करून ग्राहकांची फसवणूक करणांऱ्या विरोधात वैद्यमापन शास्त्र नियंत्रक अमिताभ गुप्ता यांच्या आदेशानुसार वैधमापन शास्त्र विभागाने धडक कारवाई केली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच अनेक ग्राहकांनी सिनेमागृहे, फूड मॉल, हॉटेल्स, रेल्वे व बस स्थानकांवर छापील किंमतीपेक्षा जास्त दराने किंमती आकारून शासनाची व सर्वसामान्य ग्राहकांची फसवणूक करीत असल्याबाबतच्या तक्रारीही केल्या आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मोहिमेत पॅकबंद वस्तूवर योग्य माहिती न छापल्याप्रमाणे ९ तर छापील किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणाऱ्या ७५ आणि वजन मापांची फेरपडताळणी व मुद्रांकन न केल्यामुळे ३९ असे एकूण १२३ जणांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार छापील किंमतीपेक्षा जास्त दराने किंमती आकारणाऱ्या आस्थापनांवर/दुकांनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, वरील सर्व ठिकाणी टाकलेल्या धाडीमध्ये किती व्यक्ती व संस्थाविरोधात कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल केलेल्या कारवाईत किती दंड वसुल करण्यात आला,
(६) असल्यास, ग्राहकांची होणारी प्रचंड लूट कायमची थांबविण्याकरीता अद्यापी कोणतीही उपाययोजना न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर मोहिमेत पॅकबंद वस्तूवर योग्य माहिती न छापल्याबद्दल १८, पॅकबंद वस्तू छापील किंमतीपेक्षा जादा दराने विक्री केल्याबद्दल ७५ आणि वजन मापांची फेरपडताळणी व मुद्रांकन न केल्याबद्दल १९ असे एकूण ११२ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत,
(४) तपासणीमध्ये दोषी आढळलेल्या आस्थापनांवर वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९ व त्याअंतर्गत नियमातील तरतुदीनुसार खटले दाखल करण्यात आले आहेत.
(५) तपासणी मोहिमेमध्ये दोषी आढळलेल्या एकूण ११२ प्रकरणांपैकी ५२ प्रकरणे प्रशमित करण्यात आली असून त्यापोटी रु.१,६०,०५०/- इतके प्रशमन शुल्क जमा करण्यात आले आहे व उर्वरित ६० प्रकरणापैकी १ प्रकरण न्यायालयात दाखल करण्यात आले असून ५९ प्रकरणे प्रशमन/न्यायालयात दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) क्षेत्रिय अधिकाऱ्यांना ग्राहक हितार्थ दरमहा विविध आस्थापनांची तपासणी व नोंद करावयाचे खटले यांचे उद्ष्टि देण्यात आलेले आहे. तसेच वेळोवेळी आवश्यकतेनुसार विशेष मोहिमांचे आयोजन करण्यात येत असते.

---

**पुणे जिल्ह्यात टंचाईकाळात विविध उपाययोजनांवर खर्च केला असूनही पाणी टंचाई कमी झाली नसल्याबाबत**

**(१८) ५५४९८ (१०-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यात टंचाईकाळात विविध उपाययोजना करण्यासाठी सन २००७ पासून टंचाई आराखड्यावर सुमारे रूपये ६३ कोटी ४५ लाख ७१ हजारांचा खर्च केला असूनही यावर्षीच्या आराखड्याप्रमाणे १० कोटींची कामे सुरु आहेत. या दहा वर्षात रुपये ७३ कोटी खर्च करुनही अद्याप माहे मे, २०१६ अखेरपर्यंत पाणीटंचाई कमी झाल्याचे आढळून आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आज पाणीटंचाईचा सामना करतांना येथील ग्रामस्थांना १०० टँकर पुरवावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पाणी टंचाईची समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६)** :(१) होय, हे अंशत: खरे आहे.

टंचाई आराखडयानुसर सन २००७-०८ पासून ७०५९.७७ लक्ष एवढा खर्च झाला आहे.

टंचाई निवारणार्थ घेण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे पाणी टंचाई कमी झालेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

या वर्षी सन २०१५-१६ च्या टंचाई कालावधीमध्ये पुणे जिल्हयात दिनांक २२.०६.२०१६ रोजी उच्चांकी १४७ टँकरद्वारे ९६ गावे ८३७ वाडयांना पाणी पुरवठा करावा लागला आहे.

(३) पुणे जिल्हयामध्ये पाणी टंचाईची समस्या सोडविण्याबाबत ऑक्टोबर, २०१५ ते जून, २०१६ अखेर टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शीतपेयांवर बंदी घालण्याबाबत**

**(१९) ५५८२५ (०५-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विकण्यात येणाऱ्या शीतपेयांमुळे दात, मणके, कमरेची हाडे ठिसूळ होणे, तसेच मधुमेह, स्थूलत्व, हृदयरोग इत्यादी आजार उद्भवत असल्याचे सेंटर फॉर सायन्स इन दी पब्लिक इंटरेस्ट (सीएसपीआय) या केंद्राने अहवालात नमूद केले असून सदर शीतपेय ही आरोग्यास हानीकारक असल्याचे माहे एप्रिल २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने आरोग्यास हानीकारक असलेल्या शीतपेयांवर प्रतिबंधक घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६)** :(१) अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील शासकीय धान्य गोदामाची झालेली दुरवस्था**

**(२०) ५६०६७ (१०-०८-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय धान्य गोदामाची दुरवस्था झाल्यामुळे लाखो टन शिधावाटप धान्याची नासाडी होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर गोदामाच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) नागपूर येथील म्युझियम गोदाम दुरुस्तीसाठी रु.४०,३५,६३०/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या कामास दि.२६.०८.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयात प्रदूषण नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(२१) ५६१०४ (१०-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात प्रदूषण नियंत्रण कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरणाच्या सुरक्षिततेसाठी प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (०५-१०-२०१६) : (**१) व (२) हे खरे नाही. चंद्रपूर जिल्हयात प्रदूषण नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत असून चंद्रपूर जिल्हयातल्या ४ औद्योगिक क्षेत्राचे सन २००९ मध्ये असलेले समग्र पर्यावरण प्रदूषण मूल्यांकन ८३.८८ वरून ५४.४२ झालेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरात फिरती वाहने (मोबाईल व्हॅन) शिधावाटप दुकाने सुरु करण्याबाबत**

**(२२) ५६२५७ (१०-०८-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरांतर्गत फिरत्या शिधावाटप दुकानांकरिता सन २०१२-१३ पासून उपनियंत्रक शिधावाटप (आस्था) प्रधान कार्यालय, मुंबई यांच्याकडे प्रस्ताव विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरामध्ये शासनाने परवानगी दिलेली ४४ अधिकृत शिधावाटप दुकाने बंद आहेत त्यामुळे याऐवजी मुंबई शहरात ३६ फिरती वाहने (मोबाईल व्हॅन) शिधावाटप दुकाने सुरु करण्याबाबत प्रस्तावात अंतर्भुत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईच्या एलफिस्टन विभागात शिधावाटप दुकान नसल्याने ते सुरु करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा. अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली असल्याने तेथील दुकानाचा समावेश सदर प्रस्तावात आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तावित मोबाईल व्हॅन शिधावाटप दुकाने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२९-०९-२०१६) : (**१), (२), (३) व (४) मुंबई शहरामध्ये बंद असलेल्या अधिकृत शिधावाटप दुकानाऐवजी ३६ फिरती वाहने (मोबाईल व्हॅन) शिधावाटप दुकाने सुरु करण्याच्या अनुषंगाने वाहनाच्या संदर्भातील प्रस्ताव प्रादेशिक परिवहन आयुक्त, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. यामध्ये मुंबईतील एलफिस्टन विभागातील बंद दुकानाकरीता मोबाईल व्हॅनची सोय करण्याचा प्रस्ताव समाविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाटोळ (ता.शहापूर,जि.ठाणे) येथील नळपाणी योजनेचे बंद पडलेले काम त्वरीत सुरु करण्याबाबत**

**(२३) ५७९०० (१०-०८-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटोळ (ता.शहापूर,जि.ठाणे) गावासाठी सुमारे १० वर्षांपूर्वी नळपाणी योजनेसाठी आदिवासी उपयोजनेतून ५६ लक्ष रुपये मंजूर होवूनही अद्याप सदर नळपाणी योजना पूर्ण न झाल्यामुळे गावांतील महिलांना पाण्याच्या शोधात ३ ते ४ कि.मी. जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित ग्रामस्थांनी सदर नळपाणी योजनेचे बंद पडलेले काम त्वरीत सुरु होण्यासाठी निवेदने, तक्रारी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गावांतील बंद बोअरवेल, अन्य विहिरींची दुरवस्था याबाबत पंचायत समिती दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितावर कारवाई करण्याबाबत तसेच सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

सदर योजनेची अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रु.५८.९२ लक्ष इतकी आहे. टंचाई कालावधीत टँकरद्वारे गाव / पाड्याला पाणी पुरवठा करण्यात येतो.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

वेळोवेळी विंधन विहिरी व विहिरीची दुरुस्ती करण्यात येते.

(४) सदर योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांच्या मार्गदर्शक सूचना नुसार समितीमार्फत राबविण्यात येत आहे. सदरचे काम समितीच्या उदासिनतेमुळे आज पर्यंत अपूर्ण आहे. तसेच या योजनेमध्ये वितरीत रक्कम व झालेल्या कामाचे मुल्यांकन यात रुपये ५.६४ लक्ष इतक्या रकमेची तफावत आढळल्याने समितीचे अध्यक्ष, सचिव, सरपंच, अन्य ग्रामसेवक यांचे दिनांक २६/०६/२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली व त्यांना तफावत रक्कम भरणे किंवा काम पूर्ण करणेचे आदेश देण्यात आले आहेत. तथापि, दिनांक ३०/०६/२०१६ रोजी रुपये १.३० लक्ष समितीच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. उर्वरित रक्कमेचे काम दोन महिन्यात पूर्ण करण्याचे समितीने आश्वासन दिल्याचे उपअभियंता यांनी लेखी कळविले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील पुरातन वास्तूंची राज्य पुरातत्व विभागाच्या विशेष समितीने केलेली पाहणी**

**(२४) ५७९०९ (०५-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील धार्मिक स्थळे, गड-कोट-किल्ले, राजवाडे, नदी घाट, गुंफा-लेणी अशा अनेक पुरातन वास्तूची पाहणी करण्याकरिता दिनांक २४ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास राज्य पुरातत्व विभागाची विशेष समिती आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने केलेल्या पाहणीत काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर समितीने कोणत्या तातडीच्या उपाययोजना करण्यासंदर्भात शिफारस केली आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१६) :**(१) नाही,

तथापि डॉ. शिखा जैन, राजस्थानच्या सल्लागार यांना दिनांक २३ मे ते २८ मे २०१६ या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या दौऱ्यावर बोलविण्यात आले होते. सदर दौऱ्यात त्यांनी रायगड, शिवनेरी, पन्हाळा, सिंधुदुर्ग व विजयदुर्ग या किल्ल्यांची पाहणी केली. महाराष्ट्रातील किल्ल्यांचा समावेश जागतिक वारसा यादीत समाविष्ठ करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली येथील कुमूद ड्रग्जस प्रा.लि. या कंपनीमधील औषध प्रकरणात सहभागी आढळलेल्या सहआयुक्ताची चौकशी करण्याबाबत**

**(२५) ५७९५९ (०५-०८-२०१६). डॉ.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील कुमूद ड्रग्जस प्रा.लि. या कंपनीमधील केटामिन व गुंगीचे औषध प्रकरणात सहभागी आढळलेल्या सांगली कार्यालयातील त्यावेळी कार्यरत असलेले सह आयुक्त, सहायक आयुक्त व औषध निरिक्षक यांचेविरुध्द म.ना.से. (शि.व. अ.) नियम, १९७९ मधील नियम ८ अन्वये सुरु असलेली विभागीय चौकशीची कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीतून काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०३-१०-२०१६) :** (१) व (२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांची चौकशी करण्याबाबत**

**(२६) ५८०४२ (१०-०८-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांची चौकशी करण्याबाबतचे आदेश मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी दिल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील किती व कोणकोणत्या पाणी पुरवठा योजनांची चौकशी सुरु करण्यात आली आहे,
(३) असल्यास, उक्त चौकशी पूर्ण झाली असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) :** (१) होय.
(२) उस्मानाबाद जिल्ह्यातील भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असलेल्या एकूण ११९ योजनांची चौकशी करण्यात आली आहे. त्यापैकी आर्थिक अनियमितता आढळून आलेल्या ४० योजनांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| तालुका | योजनांची एकूण संख्या | आर्थिक अनियमितता आढळून आलेल्या योजनेचे नांव |
|---|---|---|
| उस्मानाबाद | २४ | भानसगांव, बोरगांव राजे, जूनोनी, म्होतरवाडी, शेकापूर, वडगांव (शि.), वाघोली-७ |
| कळंब | २५ | बहुला, लमाण ता.शिराढोण, नागझरवाडी, पाडोळी ना.,गोली, शिराढोण, कोथळा - ७ |
| तुळजापूर | २९ | आरळी बु., आपसिंगा, चिकुंद्रा, ढेकरी, गंधोरा, गुळहळ्ळी, घट्टेवाडी, निलेगांव, सिदफळ - ९ |
| लोहारा | ७ | तावशीगड चिरकापाटी, मोघा खु., नागराळ लोहारा - ३ |
| उमरगा | ११ | गुगळगांव व वाडी, एकुरगा वाडी, वरणाळवाडी, कोळसर गुंजोटी जाधव तांडा, तुगांव, भुसणी - ६ |
| भूम | ८ | माणकेश्वर, अंबो -२ |
| परंडा | १३ | गोसावीवाडी, लोणी व वस्त्या, देवगांव बु., हिंगणगांव खु, कुकडगांव - ५ |
| वाशी | २ | घोडकी व वस्त्या - १ |
| एकूण | ११९ | एकूण - ४० |

(३) चौकशी करण्यात आलेल्या ११९ योजनांचा अहवाल खालील प्रमाणे आहे.

१) चौकशी करण्यात आलेल्या योजनांची संख्या ११९ योजना

२) चौकशीमध्ये आर्थिक अनियमितता आढळून आलेल्या ४० योजनांपैकी २३ योजनांची पूर्णत: व ५ योजनांची अंशत: अशी एकूण रु.५२.३५ लक्ष वसूली करण्यात आलेली आहे. उर्वरित १२ योजना पूर्णत: व उपरोक्त ५ अंशत: योजनांची वसुलपात्र रक्कम रु. ४३.१३ लक्ष एवढी वसूली झालेली नाही. त्यामुळे सदरील योजनांच्या अध्यक्ष /सचिव ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचेकडून वसुलपात्र रक्कम वसुली करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ग्रामीण पायाभूत विकास सुविधा कार्यक्रमां अंतर्गत (RIDF) आणि नाबार्ड च्या कर्जासह सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठीच्या साठवण क्षमतेमध्ये वाढ करण्याबाबत**

**(२७) ५८२०४ (१०-०८-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण पायाभूत विकास सुविधा कार्यक्रमां अंतर्गत (RIDF) आणि नाबार्ड च्या कर्जासह सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठीच्या साठवण क्षमतेमध्ये वाढ करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी लागणाऱ्या साठवण क्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी राज्यभरात १२८ गोदामे प्रस्तावित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावित गोदामे कोणकोणत्या जिल्हयात आहेत, यापैकी किती गोदामांची बांधकामे सुरु झाली आहेत,

(४) असल्यास, प्रत्येक गोडाऊनची साठवण क्षमता किती आहे व सन २०१४-१५ व २०१५-१६ या कालावधीत साठवण क्षमतेत झालेली वाढ किती आहे, साठवण क्षमतेत किती वाढ होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२६-०९-२०१६)** : (१), (२), (३), (४) व (५)

राज्य शासनाने नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी मालिका-१७ अंतर्गत उपलब्ध कर्ज स्वरुपातील अर्थसहाय्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थैंतर्गत नवीन गोदाम बांधकाम कार्यक्रम हाती घेतला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत राज्यभरात मुंबई उपनगर वगळता इतर सर्व जिल्हयात सुमारे ५.९५ लक्ष मे.टन क्षमतेची गोदामे बांधणे प्रस्तावित आहेत.

या प्रस्तावित गोदामांपैकी आतापर्यत एकूण २३३ गोदाम बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या असून त्यापैकी २०१ गोदाम बांधकामे सुरु झाली आहेत.

सदर कार्यक्रमांतर्गत माहे ऑगस्ट, २०१६ पर्यत सुमारे १.४६ लक्ष मे.टन क्षमतेची १२५ गोदाम बांधकामे पूर्ण झाली आहेत.

---

**विशाळगड (ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर) येथील मुंढा दरवाजाचे होत असलेल्या विद्दपिकरनाबाबत**

**(२८) ५८५२५ (०५-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विशाळगड हे शाहुवाडी तालुक्यातील एक ऐतिहासिक किल्ला असलेले व प्रसिद्ध असे पर्यटन स्थळ असुन सदर किल्ल्याची तटबंदी व बुरुज पुरातत्व खात्याच्या दुर्लक्षामुळे ढासळत चालला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किल्ल्याची योग्य ती देखभाल करून किल्ला जतन करण्यासाठी तसेच विशाळगडावर नव्याने उभारण्यात आलेल्या मुंढा दरवाजा पर्यटनाचे आकर्षण ठरत असून अपप्रवृत्तीकडून दरवाजावर रंगी बेरंगी खडू वापरून अश्लील शब्दात लिखाण केले जात असल्याने दरवाजाचे सौंदर्य जपण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१६) :** (१) नाही.

विशाळगड हा किल्ला राज्य संरक्षित स्मारक असून त्यांची जतन व दुरुस्तीची कार्यवाही पुरातत्व विभागामार्फत करण्यात येते. त्यानुसार सन २०११-१२ करीता प्राप्त निधीतून रु.८६.२६ कोटी इतक्या रकमेची कामे पुर्ण करण्यात आली आहे. यात मुंढा दरवाजा, पंतप्रतिनिधी निवास या वास्तुची जतन व दुरुस्तीचा समावेश आहे. तसेच किल्ल्याच्या दर्शनी भागातील तटबंदी, बुरुज व मुख्य प्रवेशव्दाराचे जतन व संवर्धन करण्याकरीता अंदाजपत्रक पुरातत्व संचालनालयाकडून तयार करण्यात येत आहे.

(२) मुंढा दरवाजावर करण्यात आलेले लिखाण स्वच्छ करण्यात येईल. तसेच ऐतिहासिक वारसा खराब करु नये याबाबत पर्यटकांना आवाहन करण्याकरीता फलक लावण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पोखरी (ता.आंबेगाव,जि.पुणे) प्रादेशिक नळ-पाणी पुरवठा योजनेचा स्त्रोत आटल्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(२९) ५८६०४ (१०-०८-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील डिंभे धरणातील पाण्याने तळ गाठला असल्याने या पाण्यावर अवलंबून असलेल्या पोखरी (ता.आंबेगाव,जि.पुणे) प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेचा स्त्रोत आटल्यामुळे सदर भागातील ६ आदिवासी गावांतील लोकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गांवाना पिण्याच्या पाण्याची कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) :**(१) व (२) हे खरे आहे.

पोखरी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचा उद्भव असणारी जॅकवेल डिंभे धरणाचे बॅक वाटर मध्ये आहे. दि.४.०५.२०१६ रोजी धरणाची पाणी पातळी कमी झाल्याने जॅकवेल मध्ये उताराने

पाणी येणे बंद झाले. परंतु पाणी टंचाई भासू नये म्हणून तात्काळ दि.७.०५.२०१६ रोजी धरणाच्या उपलब्ध पाणी साठ्यामध्ये ५ एच.पी. चा पाणबुडा पंप बसवून व एच.डी.पी.ई.पाईपद्वारे जॅकवेल मध्ये पाणी घेण्यात येऊन योजनेचा पाणी पुरवठा चालू करण्यात आला होता. त्यामुळे समाविष्ट गावांना पाणी टंचाई भासली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ऑनलाईन खरेदीमध्ये झालेल्या फसवणूकीबाबत**
**तक्रार करण्याच्या कार्यवाहीबाबत**

**(३०) ५८७४५ (१०-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ऑनलाईन खरेदीचे प्रमाण वाढले असून ऑनलाईन दिसणारी वस्तू आणि प्रत्यक्षात दिली जाणारी वस्तू यामध्ये काही वेळा तफावत येत असून ग्राहकांची हजारो रुपयांपासून लाखो रुपयांची फसवणूक होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ऑनलाईन खरेदी केलेल्या फसवणूकीच्या तक्रारी कोणाकडे कराव्यात याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम असल्याने सदर प्रकरणातील तक्रारी दाखल करण्यात येत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारी नक्की कोणाकडे कराव्यात, तसेच याप्रकरणी आतापर्यंत अशा किती तक्रारी प्राप्त झाल्या व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२९-०९-२०१६) :**(१), (२), (३) व (४) ऑनलाईन खरेदी करण्यात आलेल्या वस्तुत दोष, कमतरता अथवा त्रुटी असल्याबाबतच्या तक्रारी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचामध्ये ग्राहकांकडून प्राप्त होत आहेत.

ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ मधील तरतुदीनुसार संबंधित ग्राहकाने अधिकारीता प्राप्त असलेल्या जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे विहित कार्यपद्धतीनुसार लेखी तक्रारी करणे आवश्यक आहे.

राज्यातील ४० जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचापैकी ११ जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचामध्ये ऑनलाईन खरेदीबाबतच्या ८१ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यापैकी २५ तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे. त्यापैकी ७ तक्रारींमध्ये ग्राहकास नुकसान भरपाई प्राप्त झाली आहे. ११ प्रकरणी तक्रारदार ग्राहकाच्या बाजूने निर्णय देण्यात आल्या आहेत. या व्यतिरिक्त ५६ तक्रारींवर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाकडून न्यायिक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**भिंवडी, मुरबाड, शहापूर (जि.ठाणे) या तालुक्यातील शिधावाटप दुकानातून रॉकेल व धान्यांचा काळाबाजार होत असल्याबाबत**

**(३१) ५९१४२ (१०-०८-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंवडी, मुरबाड, शहापूर (जि.ठाणे) या तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील शिधावाटप दुकानातून मिळणाऱ्या रॉकेल व धान्यांचा काळाबाजार केला जात असल्याच्या तक्रारी ग्राहकांनी ठाण्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी स्वरुपात केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीमध्ये गॅस एजन्सी व रॉकेल विक्रेते यांचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

अशा स्वरुपाची कोणतीही लेखी तक्रार जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) भिवंडी तालुक्यातील मौजे पडघे येथे गॅस एजन्सीची माहे मे, २०१६ मध्ये तपासणी केली असता गॅस सिलेंडरचा अनधिकृत साठा आढळून आला. सदर ठिकाणी १ टेम्पो व २६ गॅस सिलेंडर असा एकूण रु.१,५१,२७२/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच मुरबाड तालुक्यातील मौजे सरळगाव व शहापूर तालुक्यातील मौजे अंदाड येथील किरकोळ केरोसिन परवानाधारकांच्या करण्यात आलेल्या नियमित तपासणीमध्ये दोषी आढळून आलेल्या परवानाधारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरूर (जि. बीड) तालुक्यातील दुष्काळी गावांना जायकवाडी धरणातून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबाबत**

**(३२) ५९४५२ (१०-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर (जि.बीड) तालुक्यातील दुष्काळी ४० गावांना जायकवाडी धरणातून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून सातत्याने शासनाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या पूर्ततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) :** (१) होय.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा करुन शिरुर तालुक्यातील कोणत्या गावांसाठी जायकवाडी धरणातून प्रादेशिक पाणी पुरवठा योजना राबवावयाची आहे हे ठरविण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी करुन सदर गावांची यादी तयार करुन त्यानुसार उचित कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात डाळींवरील स्थानिक कराची (व्हॅट) वसुली कमी करण्याबाबत

**(३३) ५९७२० (१०-०८-२०१६). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डाळींवरील भाव प्रमाणाबाहेर वाढू नयेत यासाठी केंद्रीय अन्न व पुरवठा मंत्री श्री. रामविलास पासवान यांनी बाजार समित्या व राज्य शासनातर्फे डाळींवर आकारण्यात येणाऱ्या स्थानिक करांची वसुली तूर्त बंद करावी अशा सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

डाळींचे दर नियंत्रित रहावेत, यासाठी बाजार समित्या व राज्य सरकारांतर्फे डाळींवर आकारण्यात येणाऱ्या स्थानिक करांची वसूली बंद करण्याबाबत, मा.केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.रामविलास पासवान यांच्या सूचना या विभागास प्राप्त झालेल्या नाहीत.

राज्यात डाळींना मूल्यवर्धित कर (VAT) तसेच स्थानिक संस्था करातून वगळण्यात आल्याचे, वित्त विभाग व नगर विकास विभागाने स्पष्ट केले आहे.

म्हणजेच सद्य:स्थितीत, राज्यात डाळींवर स्थानिक कर तसेच मूल्यवर्धित कर आकारला जात नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शिरोळ (जि. कोल्हापूर) तालुक्यातील राष्ट्रीय पेयजल नळ योजनांच्या कामांच्या चौकशीबाबत

**(३४) ५९७२२ (१०-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील राष्ट्रीय पेयजल नळ योजनेचे काम मुदतीत पूर्ण न झाल्याने यावर जादा खर्च करावा लागणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील १२ गावांतील पाणी योजनेमध्ये सुमारे रुपये अडीच कोटींचा गैरव्यवहार झाल्याने त्यापैकी याप्रकरणी ३ योजनांतील अनियमिततेबाबत संबंधितावर खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे, २ योजनांबाबत वसुली करण्यात आली आहे, ४ योजनांच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधिताकडून खुलासे मागविण्यात आले आहेत व एका योजनेची जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फ़त संयुक्त पहाणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) शिरोळ तालुक्यातील १२ गावांतील योजनांपैकी १० योजनांच्या चौकशी अहवालामध्ये अनियमितता आढळल्याने, त्यानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

अ) तेरवाड, कवठेसर व चिपरी या तीन योजनांमध्ये संबंधित शाखा अभियंता व उपअभियंता यांचेवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत खातेनिहाय चौकशी सुरु आहे.

ब) शिरदवाड, शिवनाकवाडी व लाटवाडी या तीन योजनांमध्ये संबंधीत मक्तेदारास दंड आकारणी करुन ३-ब ची नोटीस देण्यात आली आहे.

क) शिरढोण, टाकवडे व नृसिंहवाडी या ३ योजनांमध्ये अदा केलेली या तीन योजनांमध्ये अदा केलेली जादा रक्कम वसुल करण्यात आली आहे

ड) आलास या योजनेमध्ये केलेल्या चौकशीनुसार संबंधीतांचे खुलासे प्राप्त झाले असून, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडे सादर करण्यात येत आहेत.

इ) शिरोड या योजनेची महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तांत्रिक सेवा पुरवठादार असलेने सदर योजनेचे तांत्रिक परिक्षण जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांचेसमवेत तपासणी करुन संयुक्त अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

ई) हेरवाड या योजनेसंदर्भात हेरवाड ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, अध्यक्ष, ग्राम आरोग्य, पाणी पुरवठा पोषण व स्वच्छता समिती तसेच इतर ग्रामस्थांच्या समवेत चौकशी करण्यात आली. सदर तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिधावाटप दुकानांमध्ये पॉईंट ऑफ सेल हे उपकरण बसविण्याबाबत**

**(३५) ६०२६८ (१०-०८-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्था पारदर्शक व गैरव्यवहार मुक्त करण्यासाठी राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्णत: संगणकीकरण करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात किती शासनमान्य शिधावाटप दुकाने सुरु आहेत व अशा दुकानामध्ये पॉईंट ऑफ सेल हे उपकरण बसविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व यासाठी किती कोटी खर्च येणार आहे, त्यासाठीच्या निधीच्या तरतूदीबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१९-०९-२०१६) :** (१) होय
(२) राज्यात ऑगस्ट, २०१६ अखेर ५१५९६ एवढी रास्तभाव दुकाने असून या दुकानामध्ये पॉईट ऑफ सेल हे उपकरण बसविण्यात येणार आहे.
(३) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पातंर्गत रास्तभाव दुकानातून लाभार्थ्यांची बायोमेट्रीक ओळख पटवून त्यांना शिधावस्तूचे वितरण करताना पॉईट ऑफ सेल चा वापर करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी रु.१९८.६४ कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाने मान्यता दिली असून आवश्यक तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. पॉईट ऑफ सेल उपकरणे रास्तभाव दुकानांत बसविण्याकरिता RFP (Request For Proposal) दि.१८ जुलै, २०१६ रोजी mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. कंत्राटदाराची निवड झाल्यानंतर २४ आठवडयात प्रकल्प कार्यान्वित (Go live) करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पारोळा (जि.जळगांव) येथील भुईकोट किल्ल्याच्या सुशोभीकरण व दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत**

**(३६) ६०८८९ (०५-०८-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) येथील भुईकोट किल्ल्याचे सुशोभीकरण व दुरुस्तीसाठी पुरातत्व विभागाकडून सन २००१-२००२ पासून रुपये २,४१,७८,१८५ इतका निधी प्राप्त असून १३ व्या वित्त आयोग सन २०१३-२०१४ करीता रु. ४ कोटी निधी प्रस्तावीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भुईकोट किल्ल्याच्या सुशोभीकरण व दुरुस्तीच्या कामामध्ये संबंधीत अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमताने लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्यामुळे सदर कामे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तसेच नागरिकांनी वेळोवेळी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने प्रस्तावित रुपये ४.०० कोटी निधी तातडीने मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१६) :** (१) होय.

पारोळा किल्ला या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरुस्तीची एकूण रु.२,४२,५७,१५५/- इतक्या रकमेची कामे करण्यात आली आहे. तसेच १३ व्या वित्त आयोगामार्फत सन २०१३-१४ करीता रु.४.०० कोटी इतका निधी प्रस्तावित करण्यात आला होता. तथापि वित्त आयोगाचा कालावधी संपल्याने सदर निधी प्राप्त होणार नाही.
(२) होय.
(३) होय.

तक्रारींच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचेकडून झालेल्या कामाची तांत्रिक तपासणी करुन घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे तारदाळ-खोतवाडी (ता. हातकणंगले, जि. कोल्हापुर) राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत असणारे नळ पाणीपुरवठा योजनेचे काम बंद असलेबाबत**

**(३७) ६१५८४ (१०-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तारदाळ-खोतवाडी (ता. हातकणंगले, जि. कोल्हापुर) नळ पाणीपुरवठा योजनेचे राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत असणारे काम दरसूचीत वाढ झाल्यामुळे बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुधारित योजनेची किमंत रू.८३३.११ लक्ष निव्वळ व ९१४.६३ लक्ष ढोबळ इतकी झाली असून मंजुरीचा प्रस्ताव जि.प.कोल्हापुर मार्फत शासनाकडे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दोन्ही गांवे अति टंचाईग्रस्त असल्यामुळे सुधारीत प्रस्तावाला त्वरीत मान्यता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, इचलकरंजी यांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा.पाणीपुरवठा मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) : (**१) हे खरे नाही.
(२) होय. तारदाळ- खोतवाडी संयुक्त नळ पाणी पुरवठा योजनेच्या ८२३.११ लक्ष (निव्वळ) व रु.९१४.६३ लक्ष (ढोबळ) इतक्या रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.
(३) होय.
(४) सदर प्रस्तावाच्या छाननीअंती उपस्थित झालेल्या मुद्यांची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून दिनांक ६/४/२०१६ च्या पत्रान्वये मागविण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राळेगांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील पाणी पुरवठा योजना अपूर्ण असल्याबाबत

**(३८) ६१७०५ (१०-०८-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राळेगांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागामधून डोंगरगांव, खैरगांव का.पिपंरी सा.परसोडा, आष्टी, येवती चिखली, सराटी, करंजी या ठिकाणी भारत निर्माण आणि राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत मंजुर झालेल्या पाणी पुरवठा योजनांची कामे काही ठिकाणी अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अपूर्ण राहीलेल्या पाणी पुरवठा नळ योजना पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
सदर योजनांपैकी आष्टा व येवती या २ योजनांची कामे पूर्ण झाली असून, उर्वरीत डोंगरगांव, खैरगांव (का), पिंपरी (सा.) परसोडा, चिखली (वि.), सराटी, करंजी (सो) या ७ योजनांची किरकोळ स्वरुपाची कामे शिल्लक आहेत.
(२) अपूर्ण असलेल्या योजनांची कामे पुर्ण करण्याबाबत ४ महिन्यांत कार्यवाही करण्याच्या सूचना शासन स्तरावरुन दिनांक ३१/८/२०१६ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औंध (जि.पुणे) येथील स्वस्त धान्य वितरणाचा गहू व तांदूळ खाणीत टाकल्याबाबत**

**(३९) ६२५१८ (१०-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंध (जि.पुणे) येथील स्वस्त धान्य दुकानातील नागरीकांना वितरीत करण्यात येणारा सुमारे शंभर पोती गहू आणि पन्नास गोण्या तांदूळ औंध येथील खाणीत टाकल्याचा प्रकार दिनांक १३ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२९-०९-२०१६) :** (१) होय, अंदाजे गहु व तांदळाची २० ते २५ पोती अस्ताव्यस्त अवस्थेत दिसून आली.

(२) संबंधित स्वस्त धान्य दुकानाची तपासणी केली असता, गहु व तांदुळाचा पुस्तकीसाठा व शिल्लक साठा यामध्ये तफावत आढळून आल्याने जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ अंतर्गत महाराष्ट्र अनुसूचित वस्तू वितरण अधिनियम परवाना आदेश १९७५ मधील शर्ती व अटींचा भंग केल्याने, संबंधित दुकानाचा परवाना रद्द करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यामधील प्रादेशिक पाणीपुरवठा**
**योजनांकडे विजेची थकबाकी असल्याबाबत**

**(४०) ६२५३७ (१०-०८-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यामध्ये असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांकडे सुमारे १७ कोटी ७३ लाख रुपये विजेची थकबाकी असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणीपट्टी वसूलीसाठी ग्रामपंचायतीना प्रोत्साहित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (६-०९-२०१६) :** (१) होय, रु.१७.३९ लक्ष थकबाकी आहे.

(२) पाणीपट्टी वसूली करणे व थकीत वीज देयक भरण्यास ग्रामपंचायतीना प्रोत्साहित करण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावर दि.३०.१२.२०१५ रोजी व दि.३०.०६.२०१६ रोजी प्रादेशिक पाणी पुरवठा संयुक्त समितीचे अध्यक्ष व सचिव यांची बैठक घेण्यात आली.शासन निर्णय

क्र.पापुयो २०१५/प्र.क्र.५५/उर्जा, दि.१९.११.२०१५ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना सहभागी होण्यास सदर बैठकीमध्ये मार्गदर्शन करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थानी जून २०१५ अखेर असणाऱ्या वीज बिलाच्या मूळ थकबाकी रकमेपैकी ५० टक्के रक्कम एकरकमी किंवा दहा समान हप्त्यात महावितरणाबरोबर करार करुन स्वउत्पन्नातून भरणे व उर्वरित ५० टक्के रक्कम शासनामार्फत उपलब्ध होणाऱ्या १४ व्या वित्त आयोग निधीतून तात्पुरत्या स्वरुपात भरणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच पाण्याची बचत करणे व पाण्याच्या प्रत्यक्ष वापरानुसार लाभार्थी गावांकडून पाणीपट्टीची आकारणी करण्याच्या दुष्टीने प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या उंच टाक्याना जलमापक यंत्रे बसविणे बाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथे वितरक अनेक हॉटेल व्यावसायिकांना घरगुती सिलेंडर विकत असल्याबाबत

**(४१) ६२७४२ (१०-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथे वितरक व तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागाचे अधिकारी यांच्या संगनमताने शहरातील अनेक हॉटेल व्यावसायिकांना घरगुती सिलेंडर राजरोसपणे विकत असल्याचे माहे मे, २०१६मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हयातील अनेक गावांत फ्लोराईडयुक्त पाण्याचे जलस्त्रोत आढळून आले असल्याबाबत

**(४२) ६२८४० (१०-०८-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील नागरिकांना पिण्याचे शुध्द पाणी मिळण्याकरिता शासनाकडून लाखो रुपये खर्च करण्यात येत असताना सुमारे २५५ गावांत फ्लोराईडयुक्त पाणी नागरिकांना मिळत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयातील २५५ गावांत फ्लोराईडयुक्त पाण्याचे जलस्त्रोत आढळून आले असल्याने शासनाने जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात केलेली तरतुद कोणत्या कामाकरिता वापरण्यात आली आहे,
(३) तसेच राजनी (ता.झरी, जि.यवतमाळ) या गावातील सार्वजनिक विहिरीचे पाणी दूषित झाले असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी उक्त विहिरीची पाहणी करून गटविकास अधिकारी व ग्रामसेवकाला सदर विहिरीच्या दुरुस्तीचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने जिल्हयात व उक्त गावातील नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा होण्यासाठी व विहिर दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

जिल्हयातील १६ तालूक्यामध्ये माहे ऑक्टोबर-२०१४ ते माहे फेब्रुवारी-२०१५ या कालावधीत रासायनिक तपासणी अभियाना अंतर्गत २५५ गावांतील ४७१ स्त्रोतांमध्ये फ्लोराईडचे प्रमाण १.५ मिली.ग्रॅम/प्रती लि.पेक्षा जास्त आढळले आहे.
(२) जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून संबंधित फ्लोराईड बाधित गावांमध्ये आर. ओ. फ्लांट लावण्याचे प्रस्तावित आहे.
(३), (४) व (५) होय, हे खरे आहे.

सदर विहिरीच्या दुरुस्तीचे कामाचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून प्रस्तावित केलेला असून, कार्यवाही सुरु आहे.

---

## नांदेड जिल्हयातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रलंबित पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत

**(४३) ६३०३२ (१०-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात पाणीटंचाई निवारणासाठी शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा विभागामार्फत कामे सुरु करण्यात आली यामध्ये सन २०१४-१५ व २०१५-१६ या दोन वर्षासाठी ४४९ कामे मंजुर करण्यात आली यापैकी केवळ ८५ कामे पूर्ण झाली असून शासनाने दिलेल्या उद्दिष्टाची पूर्तता करण्यात आली असली तरी उर्वरित कामे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रलंबित योजना तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) : (**१) हे खरे नाही

(२) नांदेड जिल्ह्यातील ४४९ योजनांपैकी सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या दोन वर्षातील २५४ प्रगती पथावरील योजनांपैकी १२० योजना कार्यान्वीत करुन नागरीकांना पाणी पुरवठा करण्यात आला आहे. उर्वरित १९५ योजनांपैकी ७२ योजनांच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तथापि, शासनाच्या दि.१४.०८.२०१५ च्या आदेशानुसार व दि.२९.०६.२०१५ नंतर नव्याने हाती घ्यावयाच्या योजनांसाठी निधी वितरीत केला जाणार नसल्यामुळे नवीन योजना हाती घेता आल्या नाहीत. तसेच १२३ नवीन योजनांचे प्रस्ताव संबंधित ग्रामपंचायत/ ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडून प्राप्त झाले नाहीत. तथापि मुख्यमंत्री पेयजल योजना (MRDWP) अंतर्गत जिल्हयातील ७२ योजनांपैकी ३८ योजना हाती घेणे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चाकण (जि.पुणे) येथील भुईकोट किल्याची भिंत व दगड कोसळून पुरातन वास्तू नष्ट होत असल्याबाबत**

**(४४) ६३१६७ (०५-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चाकण (जि.पुणे) येथील भुईकोट किल्ल्याची भिंत व दगड कोसळून पुरातन वास्तू नष्ट होत असल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भुईकोट किल्ला पुरातन वास्तू नष्ट होऊ नये याकरिता जतन करून दुरुस्ती करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी पुणे यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने पुरातन वास्तूचे जतन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) संग्रामदुर्ग किल्ला दिनांक २२.०७.२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर स्मारकाच्या जतन व दुरुस्तीचे अंदाजपत्रक सहायक संचालक, पुरातत्व विभाग, पुणे यांच्यामार्फत तयार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिंचोली (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) गावातील पाण्याच्या स्तोत्रात**
**फ्लोराईडचे प्रमाण जास्त असल्याबाबत**

**(४५) ६३६७७ (१०-०८-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचोली (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) गावातील पाण्याच्या स्तोत्रात फ्लोराईडचे प्रमाण जास्त असल्यामुळे येथील ग्रामस्थाचे आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१० मध्ये चिंचोली येथे तापाच्या साथीमुळे व फ्लोराईडयुक्त दुषित पाण्यामुळे अनेक ग्रामस्थांना जीव गमवावा लागला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी गत दोन वर्षापूर्वी जलशुध्दीकरण केंद्र बांधण्यात आले असून सदर जलशुध्दीकरण केंद्र सुरु होण्याआधीच बंद पडलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर गावातील ग्रामस्थांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे अशंत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्हयातील राजूरा तालुक्यात चिंचोली (खु.) येथे जलशुध्दीकरण केंद्र बांधण्यात आलेले नसून सन २०१२-२०१३ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत डिफ्लोरीडेशन सयंत्र बसविण्यात आले व ग्रामपंचायतीला दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करीता हस्तांतरीत करण्यांत आले. हस्तांतरणानंतर अंदाजे दिड वर्ष ह्या सयंत्राव्दारे डिफ्लोरीडेशन करुन पाणी पुरवठा सुरु होता. परंतु, त्यानंतर त्यात बिघाड झाल्याने सयंत्राची दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे.

(४) हया बाबत कोणतीही तक्रार नसल्याने चौकशी करण्यात आली नाही.

सध्यस्थितीत गावामध्ये एकूण ६ हातपंप असून त्यापैकी १ हातपंपाचे पाणी पिण्यास अयोग्य व ५ हातपंपाचे पाणी पिण्यास योग्य आहेत. त्यामुळे ह्या ५ हातपंपाचे पाणी पिण्याकरीता वापरण्यांत येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे उजणी (ता.माढा, जि. सोलापूर) येथील व्होळे नळपाणी पुरवठा**
**योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्र व पाण्याच्या टाकीसाठी संपादित**
**केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याची मागणी**

**(४६) ६३९३३ (१०-०८-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उजणी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील व्होळे नळपाणी पुरवठा योजनेच्या

जलशुध्दीकरण केंद्र व पाण्याच्या टाकीसाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याची मागणी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, बांधकाम विभाग, सोलापूर यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास करुनही सदर शेतकऱ्यांना अद्याप जमिनीचा मोबदला देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार शेतकऱ्यांना मोबदला देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होळे व २९ गावे येथील योजनेच्या जलशुदिधकरण केंद्रासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचे दुय्यम निबंधक, माढा यांनी कळविल्याप्रमाणे रु. २६०/- प्रति चौ.मी. दराने मुल्यांकन करुन, जमिनीचा मोबदल्याचा दर कळविला असता, शेतक-यांनी हा दर मान्य नसल्याचे कळविले.

त्यानुसार सदर प्रकरण कायदा व कामगार अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे सादर करण्यात आले असून, त्यांचे अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(४७) ६४११४ (१०-०८-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील बहुतांश पाणीपुरवठा योजना बंद आहेत, तर काही योजना सुरु न होताच निधीचा अपहार झाल्याचे अहवालातून माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हर्सूल व इगतपुरीलगतच्या वाड्या-पाड्यांवर पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न (१) मधील अहवालानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रश्न (२) नुसार वाड्या-पाड्यांवरील उपलब्ध पाण्याच्या विहिरी अधिग्रहीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) : (**१) अंशत: खरे आहे.

त्र्यंबकेश्वर तालुक्यात एकुण ५७ नळ पाणी पुरवठा योजना आहेत. त्यापैकी २७ योजनांचा पाणी पुरवठा सुरु करण्यात आला असून, त्यापैकी ५ योजना भौतिकदृष्ट्या पुर्ण

करण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत ३० योजना प्रगतीपथावर/रखडलेल्या असून, त्यापैकी ११ योजनासंबंधी हरसूल पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

टंचाई कालावधीत त्र्यंबक तालुक्यातील हरसुल येथे तसेच हरसुलच्या एकुण १० वाड्या/वस्त्यांसाठी टँकर अथवा विहीर अधिग्रहीत करुन पाणीपुरवठा करण्यात आलेला नाही.तथापि त्र्यंबक तालुक्यात एकुण २ गावे व ३४ वाड्यांना ७ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला असून त्र्यंबकेश्वर तालुक्यात टंचाई कालावधीत २ विहीरी अधिग्रहीत करण्यात आल्या आहे. व इगतपूरी तालुक्यात ६ गावे व १६ वाड्यांना एकुण १० टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला असून इगतपूरी तालुक्यात ४ विहीरी अधिग्रहीत करण्यात आलेल्या आहेत.
(३) ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, नाशिक या कार्यालयामार्फत त्र्यंबकेश्वर तालुक्यात ११ योजनासंबंधी हरसुल पोलीस स्टेशन येथे एफ. आय.आर. क्र. आय-२२/२०१६ नुसार गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.
(४) पाणी टंचाई कालावधीत त्र्यंबकेश्वर तालुक्यातील २ विहीरींचे अधिग्रहण करण्यात आले. तर इगतपूरी तालुक्यातील ४ विहीरींचे अधिग्रहण करण्यात आलेले होते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नीलमाती (ता.त्र्यंबकेश्वर,जि.नाशिक) येथे कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत**

**(४८) ६४११७ (१०-०८-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नीलमाती (ता.त्र्यंबकेश्वर,जि.नाशिक) या गावात तीव्र पाणीटंचाई असून तेथे टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावामध्ये कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

तथापि, सदर गाव नाशिक जिल्ह्यातील नसून पालघर जिल्ह्याच्या मोखाडा तालुक्यातील आहे.
(२) सदर गावामध्ये लघुपाटबंधारे विभागामार्फत बांधलेल्या तलावातून ५ हजार लिटर क्षमतेची टाकी बसवून इलेक्ट्रीक पंपद्वारे ठक्करबाप्पा योजनेतून कायमस्वरुपी नळ पाणी पुरवठा योजनेसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार, जि.पालघर यांनी प्रशासकीय मान्यता दिली असून त्याद्वारे काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथे डॉ.दाजीसाहेब पटवर्धन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याबाबत**

**(४९) ६४१७६ (२२-०८-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे तपोवनाच्या २०० एकर जागेवर डॉ.दाजीसाहेब पटवर्धन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासनाकडे अद्यापपर्यंत प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) नाही

(३) अत्यंत कमी आरोग्य विज्ञान विषयक अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ सुरु करणे संयुक्तिक होणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदरुख (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) जलस्वराज्य प्रकल्प अनियमितते प्रकरणी शासन आदेशाचे पालन करण्यात जिल्हा परिषद सिंधुदुर्ग कडून होत असलेल्या दिरंगाईबाबत**

**(५०) ६४३१८ (१०-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदरुख (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) जलस्वराज्य प्रकल्प अनियमितते प्रकरणी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांनी दिलेल्या जाहीर आश्वासनास वर्षाचा कालावधी लोटला तरी अद्यापपर्यंत केवळ ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, नांदरुखच्या पदाधिकारी वगळता सदर प्रकल्पातील दोषी तांत्रिक सेवा पुरवठादार व तत्कालीन जलस्वराज्य प्रकल्प कक्षातील अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, सिंधुदुर्ग यांना नांदरूख जलस्वराज्य प्रकल्पाचा तांत्रिक तपासणी अहवाल सादर करण्याचे आदेश देवूनही त्यांनी अद्याप सदर अहवाल शासनास सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकल्पातील अनियमितते प्रकरणी शासनाने वारंवार दिलेल्या आदेशांची जाणीवपूर्वक दूर्लक्ष करणाऱ्या जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग मधील तत्कालीन कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु. विभाग यांच्यासह इतर संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणातील दोषी तांत्रिक सेवा पुरवठादार व तत्कालीन जलस्वराज्य प्रकल्पातील अधिकाऱ्यांवर करण्यात येत असलेल्या कारवाईचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही,
नांदरूख (ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग) जलस्वराज्य प्रकल्प अनियमितते प्रकरणी मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांनी दिलेल्या जाहीर आश्वासनाच्या अनुषंगाने नांदरूख जलस्वराज्य प्रकल्पाचे तांत्रिक सेवा पुरवठादार यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश अध्यक्ष, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, नांदरूख यांना जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या दि.०४/०५/२०१६ च्या पत्रान्वये देण्यात आले आहेत. तसेच तत्कालिन जलस्वराज्य कक्षातील अधिकारी यांना जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या दि.०४/०५/२०१६ च्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली आहे.
(२) हे खरे नाही.

नांदरूख जलस्वराज्य प्रकल्पाचे तांत्रिक लेखा परिक्षण करणेसंदर्भात प्राप्त आदेशानुसार जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या दि.२०/०१/२०१६ च्या पत्रान्वये सरपंच/ग्रामसेवक ग्रा.पं. नांदरूख यांना नांदरूख जलस्वराज्य प्रकल्पाचे सर्व दस्तऐवज दि. २७/०१/२०१६ रोजी तपासणी कामी उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचात नांदरूख यांनी त्यांचे दि. २२/०१/२०१६ च्या पत्रान्वये सदर चौकशी करीता आवश्यक सर्व दस्तऐवज पोलिस स्टेशन मालवण यांचेकडे जमा असल्याचे कळविले आहे.
(३) याप्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि. प. सिंधुदुर्ग यांनी तपासणी केली असून अंदाजपत्रकापेक्षा काही बाबींवर रु. ७६,८८४/- एवढा जादा खर्च झालेबाबत अहवाल सादर केला आहे. त्याअनुषंगाने दि. २८/०७/२०१५ रोजी मालवण पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं. ६०/२०१५ ४०६, ३४ प्रमाणे संबंधितांवर गुन्हा नोंद करणेत आला आहे.
(४) सदर प्रकल्पातील तांत्रिक सेवा पुरवठादार यांचेवर गुन्हा नोंद करण्याचे आदेश जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या दि.४/०५/२०१६ च्या पत्रान्वये अध्यक्ष, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, नांदरूख यांना देण्यात आलेले आहेत. तत्कालिन जलस्वराज्य प्रकल्पातील अधिकाऱ्यांना जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या दि. ४/०५/२०१६ च्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.